ISSN: 2393-8900 Impact Factor : 2.7825(UIF) Volume - 5 | Issue - 4 | dECEMBER - 2018

Historicity researcH Journal

# लक्ष्मीकांत देशमुख यांच्या पाणी! पाणी! कथासंग्रहातील जाणीवा

**राजकुमार श्रीधर पवार**

**मराठी विभाग, श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा.**

## प्रास्ताविक :




९० नंतरची मराठी कथा ही बहुअंगाने विकसित झालेली मराठी कथा आहे. अनेक कथाकारांनी या काळात बदलत्या सामाजिक जीवनाची विविध परिमाणे आपल्या कथालेखनातून अभिव्यक्त केली आहेत. या कथा जागतिकीकरणाच्या काळात मानवी समाजजीवनाने स्वीकारलेल्या बदलातून उमटलेल्या साद पडसादाचे मूर्तीमंत उदाहरण म्हणून विचारात घ्याव्या लागतील. जागतिकीकरणाच्या ओघात ग्रामीण माणसांच्या जगण्याची झालेली शोकांतिका अनेक कथाकारांनी प्रभावीपणे चित्रित केलेली आहे. याच कथाकाराच्या परंपरेतील एक महत्त्वाचे कथालेखक म्हणून लक्ष्मीकांत देशमुख यांचे नाव घ्यावे लागेल. लक्ष्मीकांत देशमुख यांचा 'पाणी! पाणी!' हा कथासंग्रह ग्रामीण जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या आणि भीषण अशा प्रश्नावर आधारलेला आहे. या कथासंग्रहातील एकूणच सर्व कथांमधून लक्ष्मीकांत देशमुख यांनी ग्रामीण माणसांच्या जीवनात निर्माण झालेली पाण्याची दुर्भिक्षताप्रभावीपणे चित्रित केलेली आहे.

आधुनिकीकरणाने मानवी समाज जीवनात भौतिक स्वरूपाचे अनेक बदल घडवून आणले. परंतु, मानवी समाज जीवनाला परंपरेपासून गिळंकृत करू पाहणारे दुष्काळासारखे संकट आज वर्तमानातही तसेच तोंड आ वासून उभे आहे. त्याचे विदारक परिणाम मानवी समाज जीवनाला नव्हे तर एकूणच सजीव सृष्टीला सोसावे लागत आहेत. याची अनेक बोलकी उदाहरणे या कथासंग्रहातून लक्ष्मीकांत देशमुख यांनी सामोरे ठेवली आहेत. स्वतः एक उच्चपदस्थ अधिकारी असल्यामुळे ग्रामीण भागाशी जोडली गेलेली नाळ या अधिकार पदावरून काम करताना त्यांनी अधिकाधिक दृढ केली व ग्रामीण समाज जीवनात दुष्काळाच्या अनुषंगाने उद्भवणारे प्रश्न तसेच पाण्याच्या निमित्ताने सामोरे येणारी परिस्थिती लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कथा लेखनाची बीजे होऊन आलेली आहे. हे त्यांच्या कथासंग्रहातील अनेक कथांमधून प्रत्ययास येते.

ग्रामीण माणूस आणि त्याच्या जगण्याविषयीचे सूक्ष्म चिंतन विविध जाणीवांसह या कथासंग्रहातील अनेक कथांमधून व्यक्त झाले आहे. या जाणिवा समग्र मानवी जीवनाच्या चिंतनातून आलेले आहे. ग्रामीण माणसाविषयीची सजग संवेदनशीलता या कथासंग्रहातील अनेक कथांमधून अनुभवास येते. 'पाणी! पाणी!' या कथासंग्रहातून अभिव्यक्त झालेल्या जीवन जाणिवांचा परामर्श प्रस्तुत शोध निबंधाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे घेता येईल.

९० नंतरच्या मराठी साहित्यात जाणिवेच्या अनुषंगाने अमुलाग्र बदल होत गेलेला पहावयास मिळतो. वेगवेगळ्या सामाजिक जाणीवा, विविध सामाजिक प्रश्न तसेच ग्रामीण जीवनाच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या परिस्थितीचा नेमका आढावा घेण्याचे काम या काळातील कथाकारांनी केलेले आहे. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या 'पाणी! पाणी!' या कथासंग्रहातूनही अशाच ग्रामीण जीवनातील विविध प्रश्नांविषयीची प्रगल्भ जाणीव अभिव्यक्त होते. लक्ष्मीकांत देशमुख आपल्या कथा लेखनाच्या अनुषंगाने ग्रामीण जीवनातील विविध प्रश्नांना कशा पद्धतीने कवेत घेऊ पाहतात याविषयी ना. धो. महानोर लिहितात, " लक्ष्मीकांत देशमुख यांच्या या कथासंग्रहात शेती, शेतकरी, पाणी टंचाई, गावगाडा आणि शासकीय यंत्रणेसंबंधी परवडीच्या कथा आहेत.

आज उजाड होत चाललेली खेडी आणि तिथल्या माणसांचे जिकरीचे जगणं लेखकाने विविध कथांतून समर्थपणे मांडले आहे."१ महानोर यांनी लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कथासंग्रहात कशा पद्धतीने ग्रामीण जीवन आणि तिथल्या प्रश्नाविषयीच्या जाणिवा व्यक्त झाल्या आहेत ते स्पष्ट केले आहे.

लक्ष्मीकांत देशमुख ग्रामीण जीवन आणि तिथल्या जाणिवांशी एकरूप झालेले असल्यामुळे त्या जाणीवा ते अत्यंत सखोलतेने मांडताना पहावयास मिळते. पाणी या विषय सूत्राभोवती गुंतलेल्या कथा या कथासंग्रहामधून त्यांनी सामोरे ठेवल्या आहेत. या कथासंग्रहातील प्रत्येक कथा पाण्यामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचे वास्तव चित्र सामोरे ठेवतात तसेच त्या कथा ग्रामीण जीवनातील बदलती मनोवृत्ती आणि समस्येला आपली संधी समजून घेणाऱ्या स्वार्थी मनोवृत्तीचेही नेमके स्वरूप अधोरेखित करतात. त्यांच्या या कथा समस्या आणि त्यातून जीवन जगणारा ग्रामीण समाज व त्याचे शोषण करणारी मनोवृत्ती अशा आशय सूत्रातून या जाणिवा प्रभावीपणे शब्दबद्ध होतात. या कथासंग्रहातील जाणिवांच्या स्वरूपाचे नेमकेपण विशद करताना डॉ. रणधीर शिंदे लिहितात, " 'पाणी' या विषयसूत्राची कथामाला त्यांनी लिहिली. महाराष्ट्राच्या अवर्षणग्रस्त परिस्थितीवर भाष्य त्यामध्ये आहे. न पिकलेली शेती, पिण्याच्या पाण्याची समस्या, रोजगार हमीची तुटपुंजी कामे, रेशन दुकानदाराची मनमानी यातून एका कडवट काळ्या रंगाचे चित्र त्यांनी उभे केले आहे. एका बाजूला हिरवा सुपीक समृद्ध प्रदेश आणि दुसऱ्या बाजूला कोरडा भणंग प्रदेश अशा भौगोलिक परिसराचे चित्र आहे. या कथांमध्ये पाण्याविनाची खोलवरची तीव्रता त्यामधून अभिव्यक्त झाली आहे. तसेच पाणी हे बहिष्काराचे व शोषणाचे हत्यारही असू शकते आणि सत्ताधारी वर्ग त्याचा मुजोरपणे वापर करू शकतो, याची जाणीव या कथा देते."२ लक्ष्मीकांत देशमुख यांची कथा सभोवतालातील वास्तवाचे अनेक पदर उलगडत जाऊन त्या जाणीवा अधिकाधिक प्रगल्भतेने कशा मांडतात हे रणधीर शिंदे यांनी नेमकेपणाने विशद केले आहे.

देशमुख यांनी आपल्या समकालीन जीवनामधील विविधता अत्यंत सूक्ष्मपणे अभ्यासलेली आहे आणि त्यातूनच त्यांच्या लेखनाचा प्रवास सुरू झालेला पहावयास मिळतो. समस्या चित्रण तसेच त्याची परिणामकारकताही देशमुख यांनी आपल्या कथालेखनातून सिद्ध केलेली असल्यामुळे त्यांची कथा ही समकालीनामध्ये आपले वेगळेपण सिद्ध करते. सामाजिक जीवनाची समस्या चित्रणे हा त्यांच्या लेखनाचा प्राणभूत विशेष आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. 'पाणी! पाणी!' हा कथासंग्रह पाणीटंचाई, स्त्रीभ्रूण हत्या, बालमजुरी तसेच स्त्रियांची सुख- दुःख, ग्रामीण समाज जीवनात वाढत जाणाऱ्या शोषक प्रवृत्ती, बेकारीची समस्या अशा विविध प्रश्नांभोवती या कथा भाष्य करीत असल्यामुळे या कथांमधून आलेल्या जाणिवा वाचकांना अंतर्मुख करून सोडतात.

'लेखकाने आपले आंतरिक स्वातंत्र्य प्राणपणाने जपावे' हे रंगनाथ पठारे यांचे विधान लक्ष्मीकांत देशमुख यांच्या लेखनाला अत्यंत लागू पडणारे आहे. आपले आंतरिक स्वातंत्र्य प्राणपणाने जपल्यामुळेच त्यांच्या कथालेखनातून समकालीन

समाज वास्तवाचा नेमका पोत व्यक्त झालेला आहे. लक्ष्मीकांत देशमुख मराठी कथेची परंपरा बाजूला सारून मराठी कथेत नाविन्यपूर्णता आणण्याचा यशस्वी प्रयत्न करतात. म्हणूनच त्यांची कथा ही विविधता आणि वेधकता जोपासण्यात यशस्वी झालेली आहे. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कथालेखनाचा नेमका आवाका विशद करताना डॉ. राजशेखर शिंदे यांनी अधोरेखित केलेले मत या ठिकाणी विचारात घेणे महत्त्वाचे वाटते. ते लिहितात,. "लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कथेच्या परंपरेहून भिन्न असा एक विशेष आहे. परंपरेच्या कथा व्यक्तीभोवती फिरणाऱ्या एखाद्या दुसऱ्या व्यक्तीच्या सुखदुःखाचे चित्रण करणाऱ्या कथा नाहीत. देशमुखांची संवेदना समुहात आहे. समाजाच्या प्रश्नाला ते सामोरे जात जात राहिले.. तिथेच त्यांना आपल्या कथेचे बीज अंकुरताना त्यांना दिसत राहिले. ते एक कुशल, कुशाग्र आणि समाजाप्रती निष्ठा असलेले प्रशासक म्हणून नावाजलेले आहेत. कल्याणकारी राज्याच्या योजना राबविताना आणि त्या आखताना त्यांना केवळ समाज हित दिसत राहिले. समस्याग्रस्त समाजाला दिशा कशातून दिसेल हे पाहत राहणारा एक कथालेखक म्हणून त्यांचा निर्देश करावा लागेल. त्यांची कल्पना आणि संवेदना यामध्ये पालट दिसून येतो."३ शिंदे यांनी लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कथा लेखनाची नेमकी दिशा विशद केली आहे. यावरून या कथासंग्रहातून विविध प्रकारच्या जाणिवा कशा अभिव्यक्त होतात ते स्पष्ट होते.

लक्ष्मीकांत देशमुख यांचा जन्म दुष्काळी प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उस्मानाबाद जिल्ह्यातील असल्यामुळे लहानपणापासूनच दुष्काळाच्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष झळा त्यांना सोसाव्या लागलेल्या आहेत. दुष्काळामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीला त्यांनी बालवयापासूनच अनुभवलेले आहे. या परिस्थितीचा शेती आणि शेतीव्यवसायावरती होणारा विपरीत परिणाम त्यांनी अनुभवलेला आहे. त्यामुळे या दृष्टिकोनातून त्यांची जाणीव अधिकाधिक प्रगल्भ होत गेली आणि म्हणूनच पुढे नोकरीच्या निमित्तानेही शासकीय सेवेत असताना त्यांनी ग्रामीण भागामध्ये सातत्याने आपला वावर ठेवला आणि त्यामुळेच त्या भागातील सामाजिक परिस्थितीची नेमकी जाण त्यांना होत गेली. त्याचेच प्रत्यंतर अनेक कथेमधून अनुभवास मिळते. लक्ष्मीकांत देशमुख यांनी 'पाणी! पाणी!' या कथासंग्रहात ग्रामीण जीवनातील अशा विविध प्रकारच्या जाणिवा मांडून वाचकांना अंतर्मुख करून सोडले आहे. तसेच समकालीन सामाजिक जीवनातील वास्तव परिस्थितीचे नेमके स्वरूप अधोरेखित केले आहे. लेखक सामाजिक जाणीवेतून जेव्हा आपली अभिव्यक्ती करतो तेव्हा, त्याचे सामाजिक भान त्याच्या अभिव्यक्तीतून प्रकट होत असते. या प्रक्रियेविषयी डॉ. मथु सावंत यांनी अधोरेखित केलेले मत या ठिकाणी विचारात घेणे महत्त्वाचे वाटते. त्या लिहितात, "साहित्यातून लेखक समकालीन वास्तवाला कलात्मक प्रतिक्रिया देत असतो. जीवनावर भाष्य करत असतो. लेखक ज्या वातावरणात घडतो, त्याचे बिब-प्रतिबिंब त्याच्या साहित्यातून उमटताना आपणास दिसून येते. सर्जनशील साहित्य म्हणजे कथा, कविता, कादंबरी, नाटक अशी आपली धारणा आहे. परंतु वैचारिक लेखन ही देखील वेगळ्या अर्थाने सर्जनशीलताच असते. त्यातही स्वतंत्र असे विचार मांडले जातात. या सर्व साहित्यप्रकारांतून तत्कालीन परिस्थितीत सजग राहून लेखक लेखन करतो, तेव्हा त्यातून त्याचे सामाजिक भान प्रकट होते असते." ४ डॉ. सावंत यांनी मांडलेल्या या मतावरून लेखकाचे सामाजिक भान साहित्यातून कशा पद्धतीने प्रतिबिंबित होते ते स्पष्ट होते याच भूमिकेतून लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कथांमधून विविध जाणीवा प्रतिबिंबित झालेल्या आहेत.

सरतेशेवटी सारांश रूपाने असे म्हणता येते की, लक्ष्मीकांत देशमुख यांच्या 'पाणी! पाणी!' या कथासंग्रहातील कथातून ग्रामीण जीवनात, विशेषता शेतकऱ्यांच्या जीवनात उद्भवणाऱ्या विविध प्रश्नांना त्यांनी कलात्मकतेने मांडले आहे. या सभोवतालातील वास्तवाची अभिव्यक्ती करताना लक्ष्मीकांत देशमुख यांच्या जाणिवा किती समृद्ध आहेत याचे प्रत्यंतर वाचकाला या कथासंग्रहातील विविध कथांमधून येत राहते.लेखक अशा पद्धतीने सजग दृष्टिकोनातून सभोवतालाला न्याहाळू

लागला तर, समकालीन समाज वास्तवातील विविध प्रश्न साहित्याच्या केंद्रवर्ती येतात हा अनुभव या कथासंग्रहातून वाचकांना मिळतो.

**संदर्भ :**


१) ना. दो. महानोर, पाणी ! पाणी ! , लक्ष्मीकांत देशमुख,

२) डॉ. रणधीर शिंदे, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, ऑक्टोबर ते डिसेंबर २०१७,

३) डॉ. राजशेखर शिंदे , लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कथेतील सामाजिकता आणि वाङ्मयमूल्य, रिव्हीव ऑफ रिसर्च, डिसेंबर २०१८, पृष्ठ १.

४) डॉ. मथू सावंत, प्रतिष्ठान, नोव्हे - डिसेंबर २०१६, जानेवारी, फेब्रुवारी मार्च २०१७, पृष्ठ १७८.